# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

केसरी पुणे, २७ ऑगस्ट २०१५/५

# हुतात्मा दिनानिमित्त स्वच्छता अभियानाचे आयोजन

**राजगुरुनगर (वार्ताहर) :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हुतात्म्यांना स्वच्छता आभियानाच्या माध्यमातून आदरांजली वाहण्यात आली.

या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी हुतात्मा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांना महाविद्याजवळील हुतात्मा स्मारकामध्ये अभिवादन केले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयामध्ये क्रांतिकारकांच्या कार्याची, योगदानाची माहिती विद्यार्थांना दिली.

उपस्थित स्वयंसेवकांनी हुतात्मा स्मारक परिसराची स्वच्छता करून आपापल्या गावांमध्ये सार्वजनिक स्वच्छता राखण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. धनंजय वाघ, प्रा. महेश गाडगे यांनी केले.



सकाळ
गुरुवार, १३ ऑगस्ट २०१५
४

## विद्यार्थ्यांकडून स्मारकाची स्वच्छता

राजगुरुनगर, ता. १२ : ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून, येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हुतात्मा स्मारकाच्या परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबविले. महाविद्यालयाजवळ असलेल्या हुतात्मा राजगुरू, भगतसिंग व सुखदेव यांच्या स्मारकाचा परिसर श्रमदान करून विद्यार्थ्यांनी स्वच्छ केला. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती दिली. या उपक्रमामध्ये चारशे विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे संयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. एल. एम. मुळूक, प्रा. धनंजय वाघ, प्रा. महेश गाडगे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख